संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक    माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे

**श्राव्या डायग्नोस्टिक्स**

डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी

डॉ.सौ. चैताली सत्रेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)

डॉ. सत्रेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M..S.)

उपलब्ध सुविधा

* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार

पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ५३ वा ● ● मंगळवार दि. २२ ऑगस्ट २०२३ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

# अन्यथा शेतकऱ्याला गांजा, अफू लावायची परवानगी द्या : सदाभाऊ खोत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** देशभरात टोमॅटोपाठोपाठ कांद्याच्या किंमतीतही वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन केंद्र सरकारने शनिवारी कांदा निर्यातीवर ३१ डिसेंबरपर्यंत ४० टक्के शुल्क लादण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाचे परिणाम येत्या काही दिवसांत जाणवतील. केंद्र सरकारच्या निर्णयामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी रोष व्यक्त केला आहे. त्याचबरोबर या निर्णयामुळे विरोधी पक्ष केंद्र सरकारवर टीका करत आहे. रयत क्रांती संघटनेचे नेते सदाभाऊ खोत यांनीदेखील सरकारला धारेवर धरले आहे.



सदाभाऊ खोत

सदाभाऊ खोत म्हणाले, केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यातशुल्क वाढवल्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. लाल कांदा मातीमोल किंमतीत विकला गेला म्हणून राज्य सरकारने प्रति किलो साडेतीन रुपये याप्रमाणे अनुदान दिलं आहे. आता कुठं कांद्याला दोन पैसे मिळत असताना केंद्र सरकारचा हा निर्णय आला. मला असं वाटतं खाऱ्या अर्थाने सरकारने आता धोरण तयार करावं आणि शेतकऱ्याने शेती करायची की नाही ते सांगून टाकावं. जर प्रत्येकाला शेतकऱ्याचा शेतमाल फुकट खायचा असेल तर सरकारने शेतकऱ्याची सगळी शेती ताब्यात घ्यावी आणि शेतकऱ्याच्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला मंत्रालयातील क्लर्कइतका पगार द्यावा. जेणेकरून शेतकरीसुद्धा त्याचं कुटुंब सन्मानाने सांभाळू शकेल. सरकारला ते जमत नसेल तर शेतकऱ्याला गांजा आणि अफू लावायची (परवानगी द्यावी. आम्ही कांदा पिकवणं बंद करतो. आम्ही शेतकरी अन्नधान्य पिकवणं, भाजीपाला पिकवणं कायमचं बंद करून टाकतो. कोणाच्या शेतात काय पिकवायचं ते तुम्ही पिकवा असे सांगत, त्यांनी सरकारला धरले.

# तलाठी भरती परीक्षेत सर्व्हर डाऊनने विद्यार्थ्यांचे मोठे हाल

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी :** राज्यामध्ये सुरु असलेल्या तलाठी भरती परीक्षेमध्ये सर्व्हर डाऊन झाला असून विद्यार्थ्यांचे मोठे हाल झाले असून यामुळे विद्यार्थी संतप्त झाले आहेत. संभाजीनगर, अकोला, अमरावती आणि नागपूर या जिल्ह्यात परीक्षेआधीच सर्व्हर डाऊन झाल्याचा प्रकार समोर आला आहे. यामुळे हजारो विद्यार्थ्यांचा खोळंबा झाल्याचे पाहायला मिळाले.



अकोला : तलाठी भरती परीक्षेमध्ये सर्व्हर डाऊन झाल्याने विद्यार्थ्यांना ताटकळत बसावे लागले.

अकोला जिल्ह्यातीस बाभूळगाव आणि कापशी येथील परीक्षा केंद्रांवर हजारो विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. या परीक्षेसाठी सकाळी ९ ते ११ ही परीक्षेची वेळ होती. मात्र अचानक सर्व्हर डाऊन झाल्याने विद्यार्थ्यांची नोंदणी बंद पडली. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेची वेळ होऊन देखील परीक्षा केंद्राबाहेरच थांबवे लागत आहे.

नागपूरमध्ये देखील असाच प्रकार समोर आला आहे. नागपूर येथील बीएमव्ही महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर देखील विद्यार्थांना वर्ग खोल्यात प्रवेश मिळत नसल्याची तक्रार समोर आली आहे.

राज्यातील अनेक जिल्ह्यात हाच प्रकार समोर आला असून यामुळे परीक्षा केंद्रांच्या बाहेर परीक्षेसाठी दूरून आलेल्या हजारो विद्यार्थ्यांचा खोळंबा झाला आहे. ज्या कंपनीकडे या परीक्षा घेण्याची जबाबदारी आहे त्या कंपनीकडून अद्याप विद्यार्थ्यांना कुठलीही माहिती देण्यात आलेली नाही.

# तेलंगणा विधानसभा निवडणूकीसाठी बीआरएस कडून उमेदवारांची पहिली यादी जाहीर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**हैदराबाद :** या वर्षाच्या शेवटी तेलंगणा राज्यात विधानसभेची निवडणूक होणार आहे. या निवडणुकीत भारत राष्ट्र समिती (बीएरएस) पक्षाला पराभूत करण्यासाठी काँग्रेस आणि भाजपा पुरेपूर प्रयत्न करणार आहेत. तर दुसरीकडे बीआरएस पक्षाचे नेतेदेखील सत्ता कायम राखण्यासाठी आतापासूनच कामाला लागले आहेत. येथे अद्याप निवडणुकीची घोषणा झालेली नाही. असे असले तरी बीआरएस पक्षाने येथे आपल्या पहिल्या उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. पहिल्या यादीत एकूण ११५ जागांसाठी उमेदवारांची नावे देण्यात आलेली आहेत. तेलंगणाचे विद्यमान मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव (केसीआर) हे विधानसभेच्या गजवेल आणि कामारेड्डी या दोन जागांवर निवडणूक लढवतील. तशी माहिती बीआरएस पक्षाच्या नेत्यांनी दिली आहे.



तेलंगणाच्या एकूण ११९ जागांपैकी बीआरएस पक्षाने एकूण ११५ जागांसाठी उमेदवारांची घोषणा केली आहे. उमेदवारांची पहिली यादी जाहीर करताना केसीआर यांनी आमचा पक्ष एकूण ९५ ते १०५ जागांवर विजयी होईल, अशा विश्वास व्यक्त केला. ही यादी जाहीर करताना केसीआर यांनी आमची एमआयएम पक्षासोबतची मैत्री कायम राहणार आहे, असेही विधान केले. मात्र या दोन पक्षांत जागावाटप होणार की नाही, याबाबत मात्र अद्याप अस्पष्टता आहे. बीआर पक्षाने आपल्या पहिल्या यादीतील एकूण सात मतदारसंघासाठी उमेदवार बदलला आहे. बोथ, खानपूर, वायरा, कोरटुला, उप्पल, असीफाबाद, मेटापल्ली या मतदारसंघांचा यात समावेश आहे. तर कोशामहल, नामपल्ली, जनगाव आणि नरसापूर या जार जागांसाठी बीआरएस पक्षाने अद्याप उमेदवारांची घोषणा केलेली नाही.

दरम्यान, बीआरएस पक्षाने उमेदवारांची पहिली यादी जाहीर करताच केसीआर यांची कन्य तथा विधानपरिषदेच्या आमदार के. कविता यांनी प्रतिक्रिया दिली. या यादीतून तेलंगणातील लोकांचा विश्वास प्रतिबिंबित होत आहे, अशा भावना कविता यांनी व्यक्त केल्या. आपले नेते केसीआर यांनी ११५ उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. या यादीतून लोकांचा केसीआर यांच्यावर असलेला विश्वास प्रतित होतो. आम्ही तेलंगणातील जनतेचे आशीर्वाद मागत आहोत, अशी प्रतिक्रिया के. कविता यांनी दिली.

२०१८ सालच्या विधानसभा निवडणुकीत बीआरएस पक्षाला एकूण ८८ जागांवर विजय मिळाला होता. तर काँग्रेस आणि एमआयएम पक्षाला अनुक्रमे १९ आणि ७ जागांवर समाधान मानावे लागले होते. भाजपाचा फक्त एका जागेवर विजय झाला होता.

# उद्धव ठाकरे आणि संजय राऊतांना न्यायालयाकडून जामीन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** शिवसेना ( ठाकरे गट ) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांच्याविरोधात मानहानीचा खटला दाखल करण्यात आला होता. शिवसेना (शिंदे गट) खासदार राहुल शेवाळे यांनी हा मानहानीचा खटला दाखल केला होता. याप्रकरणी मंगळवारी न्यायालयात (२१ ऑगस्ट) सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांना १५ हजार रुपयांच्या जातमुचकल्यावर जामीन मंजूर केला आहे.



उद्धव ठाकरे    संजय राऊत

उद्धव ठाकरे दूरदृष्यप्रणालीद्वारे तर संजय राऊत प्रत्यक्षरित्या न्यायालयात हजर राहिले होते. तेव्हा, उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांनी शेवाळे यांचे आरोप मान्य नसल्याचं न्यायालयात सांगितलं. न्यायालयाने १५ हजार रुपयांच्या जातमुचकल्यावर जामीन मंजूर केला. पुढील सुनावणी १४ सप्टेंबरला होणार आहे.

२९ डिसेंबर २०२२ ला ‘सामना’च्या हिंदी आणि मराठी आवृत्तीत राहुल शेवाळे यांच्याबद्दल एक बातमी प्रसिद्ध झाली होती. राहुल शेवाळे यांची दुबईतील कन्स्ट्रक्शन कंपनीत गुंतवणूक असल्याचं त्या मथळ्यात लिहिलं होतं. या बातमीमुळे आपली बदनामी झाल्याचा आरोप करत राहुल शेवाळे यांनी उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांच्याविरोधात मानहानीचा खटला दाखल केला होता.

# तलाठी परीक्षेतील गोंधळाला राज्य सरकार जबाबदार : विजय वडेट्टीवार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**चंद्रपूर :** राज्यात तलाठी भरतीची परीक्षा सुरू असून सर्व्हर डाऊन असल्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना परिक्षेपासून वंचित राहावे लागले आहे. अन्न, पाण्याविना हजारो विद्यार्थी ताटकळत होते. अनेक परिक्षा केंद्रावर परिक्षा खोळंबल्या आहेत. शासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे एखाद्या विद्यार्थ्यांचा जीव गेल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी सरकारची असेल अशी टिका राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. दरम्यान राज्यातील सरकारने परिक्षेच्या माध्यमातून बेरोजगारांची थट्टा चालविली असल्याचा आरोप केला. नोकरी लागावी यासाठी गोर-गरीब, शेतमजूर, शेतकऱ्यांचे मुलं एक दिवस अगोदर परिक्षा केंद्रावर आली. राज्यातील विविध जिल्ह्यातून परिक्षार्थी सकाळी सात वाजता परिक्षा केंद्रावर पोहोचले होते. दहा वाजले तरी परिक्षा सुरू झाली नव्हती. सर्व्हर डाऊन असल्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना परिक्षेपासून वंचित राहावे लागले आहे. राज्यातच चार परिक्षा केंद्र आहे. त्यामुळे मुलांना प्रचंड पायपीट सहन करावी लागली. जिल्हावार परिक्षा केंद्र नसल्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. नागपूर जिल्ह्यातील परिक्षा केंद्रावर मराठवाड्यातील लातूर, जालना इथपासून विद्यार्थी आले आहेत, असे वडेट्टीवार म्हणाले.



विजय वडेट्टीवार

परिक्षेच्या नावावर विद्यार्थ्यांकडून दोनशे कोटींपेक्षा अधिकची रक्कम सरकारने गोळा केली. आता ज्या विद्यार्थ्यांना सर्व्हर डाऊनमुळे परिक्षा देता आली नाही. त्यांच्याकडून नव्याने शुल्क आकारू नये, तसेच त्या परिक्षार्थीच्या प्रवासाची सोय सरकारने करावी अशी मागणीही वडेट्टीवार यांनी यावेळी केली आहे. ऑनलाईन परिक्षेसाठी १००० रूपये घ्यायचे, परिक्षेचे योग्य पध्दतीने नियोजन करायचे नाही, वारंवार परिक्षा रद्द करायच्या यामुळे विद्यार्थी संतापले असून या सर्वांचे रूपांतर उठावात होईल, अशी ताकीद वडेट्टीवार यांनी यावेळी दिली.

# शरद पवारांची तोफ दहिवडीत धडाडणार

## २५ ऑगस्टला कार्यकर्ता संवाद मेळावा व जाहीर सभा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**दहिवडी :** राष्ट्रवादीतील फुटीनंतर खासदार शरद पवार यांनी राज्यभर विविध मतदारसंघात दौरे करुन पक्षाच्या कार्यकर्त्यांना चार्ज करण्याचे काम करत आहेत. यातून भाजपसह अजित पवार गटावर ते सडेतोड टीका करत आहेत. आता येत्या २५ ऑगस्टला खासदार शरद पवार यांची सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील दहिवडी येथे कार्यकर्ता संवाद मेळावा व जाहीर सभा होणार आहे. माणच्या सभेत खासदार शरद पवार कोणावर निशाणा साधणार याची उत्सुकता आहे. पक्ष फुटीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार व खासदार शरद पवार यांचा जिल्ह्यात दौरा झालेला नाही. येत्या २५ तारखेला कोल्हापूरकडे सभेच्या निमित्ताने जाताना ज्येष्ठ नेते पवार रयत शिक्षण संस्थेच्या कार्यक्रमानिमित्त दहिवडीत थांबणार आहेत. यावेळी त्यांच्या हस्ते विविध कार्यक्रम होतील.



सकाळी साडेअकराच्या दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसने दहिवडी बाजार पटांगणावर कार्यकर्ता संवाद मेळावा आयोजित केला आहे. त्यात ज्येष्ठ नेते पवार यांची तोफ धडाडणार आहे. या मेळाव्या ते अजित पवार गट, भाजपचे आमदार जयकुमार गोरे, की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधणार? याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

पक्षातील फुटीनंतर सभेच्या निमित्ताने श्री. पवार प्रथमच जिल्ह्यात येत आहेत. त्यांचे माण तालुक्यात राष्ट्रवादीच्या वतीने जंगी स्वागत केले जाणार आहे. कोल्हापूरच्या जाहीर सभेसाठी जाताना रॅलीने येथून कार्यकर्ते त्यांच्यासोबत जाणार आहेत. त्यामुळे माणच्या सभेत खासदार शरद पवार कोणावर निशाणा साधणार याची उत्सुकता आहे.

# आटपाडीत स्मशानभूमीची दुरावस्था

## नगरपंचायतीचे दुर्लक्ष : परिसरात घाणीचे साम्राज्य



आटपाडी : येथील स्मशानभूमीमध्ये असलेल्या पाण्याच्या टाकीच्या गळतीमुळे परिसर चिखलमयत होत आहे.

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** येथील बाजारपेठ जवळील स्मशानभूमीच्या आवारात झाडेझुडपे वाढले असून आजूबाजूला कचरा विखुरला आहे त्यामुळे दुर्गंधीचे साम्राज्य पसरले असून स्मशानभूमीची दुरावस्था झाली असून याकडे आटपाडी नगरपंचायतीचे दुर्लक्ष झाले आहे.स्मशानभूमीत प्रवेश करताना बाजूला पाण्याची टाकी असून त्याची चावी लिकेज असल्याने पाणी वाहत असून रस्ता चिखलमय झाला आहे. अंत्यविधीला गेलेल्या नागरिकांना इतर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. पाण्याच्या टाकीत पाणी असूनही वाहते पाणी समस्या कायम आहे. स्मशानभूमीला तारेच्या जाळीच्या कंपाउंड असून साफसफाई होत नसल्याने गैरसोय होते. शहरातील विविध सोयी सुविधांवर लाखो रुपये खर्च होत असले तरी, स्मशानभूमीकडे नगरपंचायत केव्हा लक्ष देणार असा सवाल आरपीआयचे अध्यक्ष राजेंद्र खरात यांनी केला आहे,

स्मशानभूमीत जाणारे व्यक्ती दुःखात असतात या ठिकाणी कायमस्वरूपी स्वच्छता मोहीम राबवावी, नगरपंचायतीने लक्ष द्यावे असे अशी अपेक्षा सर्वसामान्य नागरिक व्यक्त करत आहेत.

भाऊ कन्स्ट्रक्शन

बिल्डर्स & डेव्हलपर्स

9004792356

- उत्कृष्ट,दर्जेदार आणि मजबूत पध्दतीचे कामे.
- सर्वांच्या पसंतीत आणि विश्वासात नं.१ चे स्थान असलेले.

# आटपाडीत शेतकरी मेळावा संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी :** अलर्ट बायोटेक नाशिक व स्वराज कृषी सेवा केंद्र आटपाडी यांच्या संयुक्त विद्यमाने मासाळवाडी आटपाडी येथे शेतकरी मेळावा घेण्यात आला. मेळाव्यामध्ये प्रामुख्याने तेलकट व पिनकोड या रोगावरती नियंत्रण कसे करावे या विषयावर चर्चा करण्यात आली.



आटपाडी : येथे अलर्ट बायोटेक नाशिक व स्वराज कृषी सेवा केंद्र यांच्यावतीने शेतकरी मेळावा संपन्न झाला.

स्वराज कृषी सेवा केंद्र यांच्यातर्फे शेतकऱ्यांच्या फायद्याचे गावोगावी डाळींबा वरती बरेच कार्यक्रम घेतले जात आहेत. या कार्यक्रमाला प्रा.डॉ. प्रशांत कुंभार व आर.जी. घाटोळे, तसेच डाळिंब तज्ञ श्री. चोरमुले, दिलीप मोहिते, संतोष मोहिते उपस्थित होते. शेतकरी गोरख गायकवाड यांच्या डाळिंब बागेमध्ये हा कार्यक्रम पार पडला.

# संपादकिय

## महादेव जानकर यांचे एकला चलो रे !

आगामी लोकसभा निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपली आहे. तर राज्याच्या विधानसभा निवडणुकीला केवळ एक वर्ष बाकी आहे. दोन्ही निवडणुकांमध्ये राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना असला तर राज्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेना, स्वाभिमानी शेतकरी संघटना, राष्ट्रीय समाज पक्ष, वंचित बहुजन आघाडी यांसारखे काही पक्ष आहेत जे महायुतीत किंवा महाविकास आघाडीत सहभागी झालेले नाहीत. राष्ट्रीय समाज पक्ष हा त्यापैकीच एक आहे. महादेव जानकरांचा हा पक्ष मागील निवडणुकीत एनडीएबरोबर होता. परंतु, यावेळी मात्र त्यांची भाजपाबरोबर युती झालेली नाही. पक्षाचे सर्वेसर्वा महादेव जानकर सध्या पक्षबांधणीसाठी काम करत आहेत. ते रासपच्या जनस्वराज्य यात्रेनिमित्त राज्यभर फरत आहेत. अशातच त्यांनी आगामी निवडणुकीत 'एकला चलो रे'चा नारा दिला आहे. महादेव जानकर म्हणाले, हे मोठे पक्ष काय करतात? मोठा मासा लहान माशाला खातो. पण लहान माश्याने लक्षात ठेवलं पाहिजे की आता आपण मोठं व्हायचं आहे. म्हणून रासपने ठरवलंय आता आपण मोठं व्हायचं. सध्या देशात भाजपा आणि काँग्रेस हे दोन मोठे पक्ष आहेत. शिवसेनेत दोन गट पडले आहेत. त्यापाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन गट पडले आहेत. त्यामुळे राज्यात रासपसाठी चांगलं वातावरण आहे. खरे ते कोणताही पक्ष मोठा झाल्याशिवाय त्याची किंमत इतर पक्षाला कळत नाही. भाजपाला जेव्हा रासपची बरोबरच राजू शेट्टी, रामदास आठवले, विनायक मेटे यांची गरज होती, तेव्हा हे सगळे पक्ष एकत्र आले. परंतु त्यांना आता कळून चुकले आहे की, भाजप फक्त यांना वापरून त्यांच्याच पक्षातील पदाधिकारी फोडून पक्ष कुमकुवत करत आहेत. तर दुसरी गमंत म्हणजे, याचं पक्षाला जेव्हा विधानसभा, लोकसभा, महानगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये मात्र जागा सोडून त्या ठिकाणी उभा राहण्याऱ्या उमेदवाराला मात्र भाजपच्या तिकीटावर निवडणूक लढविण्याचा आग्रह केला जात आहे. याला सर्व प्रथम रासपचे महादेव जानकर यांनी विरोध केला. कारण भाजपचा कावा त्यांच्या लक्षात आला होता. त्यामुळे त्यांनी सध्या तरी एकला चलो ची घेतलेली भूमिका रासप ला भविष्यात तारणार हे नक्की.

# शिक्षकांच्या प्रश्नांसाठी धडपडणारे शरदराव!

यपावाडी गावचे सुपुत्र मा.शरदराव चव्हाण(पाटील) यांचा आज वाढदिवस.शांत, संयमी, अभ्यासू व्यक्तिमत्त्व शरदराव. पुणे जिल्हा परिषदेकडे शिक्षक म्हणून नोकरी मिळाल्यानंतर सुरवातीला त्यांनी केंद्रातील, तालुक्यातील शिक्षकांचे संघटन उभे केले. शिक्षक बंधू-भगिनींना नेहमी सहकार्य केले.

मा. शरदराव चव्हाण सर आंतरजिल्हा बदलीने सांगली जिल्ह्यात हजर झाले.आणि त्यांची नेमणूक स्वतःच्या गावातील शाळेत झाली. जिल्हा परिषद शाळा यपावाडी गावात अध्यापनाचे काम करत असताना अनेक गुणवंत विद्यार्थी घडवले. शाळेस स्वच्छ आणि सुंदर शाळा पुरस्कार मिळवून गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा मिळवून दिला. त्यांच्या हाताखाली घडलेले बरेच विद्यार्थी वैद्यकीय, आभियांत्रिकी क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत.

शिक्षक संघटनेत दमदार एंट्री..

मा. शरदराव चव्हाण (पाटील) यांनी आटपाडी तालुका प्राथमिक शिक्षक संघ(थोरात प्रणित) त्रैवार्षिक अधिवेशनात श्री.संभाजीराव थोरात(तात्या) यांच्या उपस्थितीत तालुका कार्यकारणीत निवडले गेले. मग इथूनच झाला, शरदपर्वाचा उदय.



तालुक्यातील वेगवेगळ्या संघटनेतील पदाधिकाऱ्यांशी ऋणानूबंध जपत सर्व शिक्षकांच्या सुख-दुःखात सहभागी झाले. मा.शरदरावांचे हे काम सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष मा.विनायकराव शिंदे, सरचिटणीस मा.अविनाश गुरव आणि सर्व जिल्हा कार्यकारणीला आवडले आणि शिक्षक बँकेच्या होवू घातलेल्या निवडणुकीत आटपाडी तालुक्यातून खुला प्रवर्गातून उमेदवारी निश्चित करण्यात आली.

खरं तर शरदरावांपुढे हे फार मोठे आव्हान होते.कारण तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी शेजारच्या सोलापूर जिल्ह्यात निर्णायक सुमारे १५०० मतदान वाढवले. मात्र हे आव्हान मा. शरदराव यांनी स्विकारले आणि निवडणुकीच्या रिंगणात उभे राहिले.कारण त्यांच्याबरोबर स्वाभिमानी मंडळाबरोबरच आटपाडी तालुक्यातील विजय राजमाने, आसिफ मुजावर, जीवन सावंत, हणमंत गायकवाड, एन.व्ही.कदम, रमेश सुर्यवंशी, रसिक सपाटे, सुनील गायकवाड, भरत कदम, शहाजी वाक्षे, राजेंद्र बदडे, नितीन वाघमारे, जयवंत पांढरे, विश्वास पुजारी, विजय गिड्डे, महेश गोंजारी, संजयकुमार काळेल, समाधान ऐवळे, जयंत देठे, सुरेश मोटे अशी शिक्षक संघाची ज्येष्ठ आणि तरुण पदाधिकाऱ्यांची फळी सोबत होती. २०१९ पासून आटपाडी तालुक्याबरोबरच संपूर्ण सांगली जिल्हा पालथा घालायला सुरवात केली.आणि वेळ मिळेल तसे सोलापूर जिल्ह्यात संपर्क वाढवला.आटपाडी तालुक्यात अनेक मातब्बर विरोधात असताना सुद्धा एका वर्षापूर्वी पार पडलेल्या शिक्षक बँकेच्या ऐतिहासिक निवडणुकीत मा.शरदराव चव्हाण(पाटील) विक्रमी मताधिक्क्याने सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेत संचालक म्हणून निवडून गेले. गेल्या वर्षभरात संपन्न झालेल्या मासिक मीटिंग मध्ये सभासदाभिमुख मुद्दे मांडून सभासदांना न्याय देण्याचा संचालक शरदराव चव्हाण(पाटील) यांच्याकडून प्रयत्न होताना दिसत आहे. शिक्षक बँकेच्या सभागृहात सभासदांच्या गुणवंत पाल्यांचे सत्कार, शिक्षक सभासदांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने रोपटे देवून एक वेगळा उपक्रम राबवत आहेत. आटपाडी तालुक्यातील जि.प. शाळेत अध्यापणाचे काम करणाऱ्या सर्व महिला भगिनींचा पुस्तक देवून सन्मान करण्याची शरदरावांची संकल्पना आटपाडी तालुका प्राथमिक शिक्षक संघ गेली बरेच वर्ष तालुक्यात राबवत आहे. शिक्षकांच्या विविध प्रश्नांसंदर्भात नेहमीच पंचायत समिती स्तरावर आक्रमक असणारे शरदराव यांना भविष्यात सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेत चेअरमन पदाची संधी मिळो एवढीच स्वाभिमानी प्राथमिक शिक्षक मंडळाकडे अपेक्षा.

धन्यवाद !!!!

**शब्दांकन-श्री.अजिनाथ बुधावले (सर)**
दिघंची, मोबा-९९७०३२९६६३

# नाशिक जिल्ह्यात ठिकठिकाणी कांदा उत्पादकांचे आंदोलन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नाशिक :** राज्यातील प्रमुख कांदा उत्पादक जिल्हा असलेल्या नाशिक जिल्ह्यात कांद्यावरील ४० टक्के निर्यात शुल्काविरोधात कांदा उत्पादक आणि व्यापारी यांनी आक्रमक होत ठिकठिकाणी आंदोलन केले. वणी येथे रास्तारोको करण्यात आला. निफाड प्रांताधिकाऱ्यांकडे ठाकरे गटातर्फे शुल्क हटविण्याची मागणी करण्यात आली. तर, पिंपळगाव बसवंत येथे आमदार दिलीप बनकर यांनी निर्णयाचा निषेध करीत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.



**नाशिक : येथे कांदा उत्पादक शेतकरी यांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करताना शेतकरी**


वणी येथील वीर बिरसा मुंडा चौकात शेतकरी संघटना आणि सर्व पक्षांच्या वतीने तासभर आंदोलन करुन केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाची होळी करण्यात आली. वणी पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक नीलेश बोडखे यांना निवेदन देण्यात आले.आंदोलनामुळे तासभर वाहतूक थांबली होती. केंद्र सरकारच्या निषेधाच्या घोषणा शेतकऱ्यांकडून देण्यात आल्या. दिंडोरीच्या खासदार डॉ. भारती पवार यांच्या भूमिकेचाही निषेध करण्यात आला. वणी येथील आंदोलनात दिंडोरी, कळवण, देवळा, सुरगाणा तालुक्यातील कांदा उत्पादक, बाजार समितीचे अध्यक्ष, संचालक, व्यापारी सहभागी झाले होते. शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संदिप जगताप, दिंडोरी कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष प्रशांत कड, गणपतबाबा पाटील, विलास कड, गंगाधर निखाडे आदी उपस्थित होते.

कांदा निर्यात शुल्क ४० टक्के केल्याच्या निषेधार्थ येवला येथे शरद जोशीप्रणित शेतकरी संघटनेच्या वतीने सोमवारी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रवेशद्वारासमोर मनमाड-शिर्डी महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी केंद्राने घेतलेला निर्णय त्वरीत रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली. पोलिसांना मोर्चेकऱ्यांनी निवेदन दिल्यावर आंदोलन स्थगित करण्यात आले. जोपर्यंत मागणी मान्य होत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहणार असल्याचा निर्धार शेतकरी संघटनेने केला आहे.

# पत्नी आणि मुलीची निर्घृण हत्या करून पतीची आत्महत्या

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**बुलढाणा :** चिखली येथे पोलिस महिला कर्मचारी असलेल्या पत्नी आणि मुलीची चाकूने हत्या करून पतीने नंतर आत्महत्या केल्याची घटना घडली. यामुळे नागपंचमीला जिल्हा हादरला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथे आज सोमवारी खुनी थरार घडला. खामगाव रोडवर असलेल्या पंचमुखी हनुमान मंदिराजवळ एका घरात हा घटनाक्रम घडला. किशोर जनार्दन कुटे असे आरोपी पती(पित्याचे) नाव आहे. त्याने महिला पोलिस कर्मचारी असलेल्या पत्नी वर्षा दंदाले चाकूने सपासप वार करून हत्या केली. या पाठोपाठ कांदा कापण्याच्या चाकूने दीड वर्षाच्या मुलीचीही हत्या केली. दोघांची निर्घृण हत्या केल्यानंतर आरोपी किशोर याने घटनास्थळावरून पळ गाठला. यानंतर थेट अंढेरा परिसरात येवून त्याने झाडाला गळफास लावून आत्महत्या केली आहे.



# जिल्ह्यात तुरळक पाऊस

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी ०.५ मि. मी. पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात गेल्या २४ तासात पडलेला पाऊस व कंसात १ जून पासून आत्तापर्यंत पडलेल्या पावसाची तालुकानिहाय आकडेवारी मि. मी. मध्ये पुढीलप्रमाणे. मिरज ०.६ (२११.७), जत ०.१ (१५९.६), खानापूर-विटा - ०.५ (१३५.३), वाळवा-इस्लामपूर ०.० (२३४.८), तासगाव १.८ (२२५.२), शिराळा ०.३ (६५०.६), आटपाडी - ०.१ (१२६.८), कवठेमहांकाळ - ०.५ (१८२), पलूस १.१ (२०८), कडेगाव - ०.० (१६९.५).












# शिवाजी विद्यापीठात पीएचडी संशोधनाच्या नावावर धूळफेक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांमध्ये पीएच. डी. संशोधनाच्या नावाखाली धूळफेक चालू आहे. इतरांनी केलेले संशोधन आपलेच आहे असे भासवले जाते. यामध्ये कॉपीपेस्टचा सर्रास वापर चालतो, असा आरोप डॉ. राजवर्धन कापशीकर यांनी सोमवारी येथे पत्रकार परिषदेमध्ये केला.

शिवाजी विद्यापीठ वर इतर राष्ट्रीय इतर प्रयोगशाळेमध्ये चालणार चालणारे आक्षेपार्ह संशोधन, डॉक्टरेट पदवी व प्राध्यापक भरती यामधील गैर व्यवहार यावर त्यांनी आपली भूमिका मांडली. सूक्ष्म जीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान, मानसशास्त्र या विषयात अर्हता प्राप्त केलेले डॉ. कापशीकर यावेळी म्हणाले, गेली १८ वर्ष विद्यापीठातील प्राध्यापक भरती विषयी जे पाहिले ते चिंतनीय आहे. निवड झालेल्या उमेदवारांची यादी विद्यापीठ हेतूपूर्वक जाहीर करत नाही. गोपनीयतेच्या नावाखाली माहिती लपवली जाते. विचारणा केल्यास माहिती देण्यास विद्यापीठ बाध्य नाही असे उत्तर प्रशासनाकडून दिले जाते. भरती प्रक्रियेत पारदर्शकता यावी यासाठी कुलगुरूंकडे विनवणी करूनही दुर्लक्ष केले जात आहे. कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव यांना याची जाणीव करून दिली असून त्याकडे दुर्लक्ष होत आहे.

पीएचडी उत्तीर्ण उमेदवार उपलब्ध असताना पीएचडीचा अभ्यास करणारे विद्यार्थी निवडले जातात. एकाच वेळी पूर्ण वेळ नोकरी व पूर्ण वेळ पीएच.डी.चा अभ्यास असे कसे काय होऊ शकते अशी विचारणा करून कापशीकर पात्र उमेदवारांना डावलले जात असल्याचा आरोप केला. विद्यापीठामध्ये पीएच.डी. संशोधक विद्यार्थी संशोधनाची विदा जतन करतात की नाही याबाबत शंका उपस्थित करून ते म्हणाले काही संशोधक विद्यार्थी प्रबंध विकत घेतात असे दिसते. बऱ्याच सुविधा विद्यापीठांमध्ये नसताना संशोधन कसे चालते ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे. संशोधनाचा दर्जा खूपच खालावलेला आहे. याबाबतच्या तक्रारी विविध आयोगांकडे केले असल्याचे त्यांनी सांगितले.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस






## माजी नगराध्यक्ष विजय सिन्हा यांचे बेमुदत उपोषण सुरू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/प्रतिनिधी :** उरमोडीचे पाणी राऊतवाडी बंधारा मध्ये सोडावे. या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते, माजी नगराध्यक्ष विजय सिन्हा यांनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे. जिल्हा प्रशासनाला आंदोलनाचे निवेदन देऊनही उरमोडीचे पाणी न सोडल्याने सिन्हा यांनी सोमवार पासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. म्हसवडसह पूर्व भागातील राऊतवाडी, मानेवस्ती, ढोकमोड, हिंगणी, देवापूर भागात जनावरांना व माणसांना दुष्काळी परिस्थितीचा फटका मोठा बसत असून प्रचंड हाल सुरु आहेत. तरी या परिस्थितीत त्यांना उरमोडीचे पाणी




**म्हसवड : येथे उरमोडीचे पाणी राऊतवाडी बंधाऱ्यात सोडावे या मागणीआठी आमरण उपोषणाला बसलेले माजी नगराध्यक्ष विजय सिन्हा**

मिळाले तर काहीअंशी दिलासा मिळेल.या भागातील शेतकऱ्यांनी उरमोडीच्या पाण्यासाठी पैसेही भरले तरी अद्याप पाणी सोडण्यात आले नाही.

माजी नगराध्यक्ष विजयभाऊ सिन्हा यांचे वय ६७ असून त्यांना मधुमेह आहे तरी ते पाण्यासाठी बेमुदत उपोषण करत आहेत. या बेमुदत उपोषणाला माजी दुग्ध व पशुसंवर्धन मंत्री, राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेवराव जानकर, माजी नगराध्यक्ष नितिन दोशी, इंजि. सुनिल पोरे, किशोर सोनवणे, कैलास भोरे, जवाहर देशमाने, बाळासाहेब राजेमाने, संजय भागवत, शशी देठे,सपोनि राजकुमार भुजबळ तसेच चळवळीतील ज्येष्ठ सहकारी तसेच राजकीय सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपोषणाला भेट दिली तसेच शहरातील विविध पक्षांचे कार्यकर्ते व शेतकरी बांधव यांनी उपोषणाला पाठिंबा दिला आहे.

## नातेपुते शहरात नागपंचमी सण आनंदात साजरा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नातेपुते/वार्ताहर :** अधिवासाचे प्रतीक, शेतकऱ्यांचा मित्र आणि निसर्ग साखळीत महत्त्वाचा घटक असलेल्या नागांबद्दल कृतज्ञता व्यक्त करून नातेपुते शहरात सोमवारी नागपंचमी उत्साहात संपन्न झाली. नागपंचमी हा श्रावणातील महत्त्वाचा सण. यावेळी सोमवारी नागपंचमी आल्याने महिलांनी नातेपुते येथील शंभू महादेवाचे दर्शन घेऊन पर्वतेश्वर मंदिराजवळ नागदेवतेची पूजा केली. महिला, मुली तसेच नवविवाहिता यासाठी हा सण म्हणजे एक खास आकर्षण होते. कारण नागपंचमीच्या दिवशी स्त्रिया-मुलींनी एकत्र येऊन हौस म्हणून हातावरती झिम्मा-फुगडी, गाणी, उंच-उंच झोके घेऊन 'नागपंचमी सण' मोठ्या उत्साहात आनंदात साजरा झाला.



**नातेपुते : येथे नागपंचमी सण महिलांनी एकत्र येवून साजरा केला.**

## भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतून खतांसाठीही अनुदान मिळणार : कृषीमंत्री धनंजय मुंडे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**



**मुंबई :** राज्याचे माजी कृषी मंत्री भाऊसाहेब फुंडकर यांच्या नावाने फलोत्पादन विभागाकडून सुरू असलेल्या भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना अंतर्गत १५ फळ पिकांचा समावेश करण्यात आला असून या अंतर्गत खड्डे खोदणे, ठिबक सिंचन यासारख्या कामांना १०० टक्के अनुदान देण्यात येते. त्याचबरोबर आता या योजनेतून आवश्यक खतांसाठी देखील १०० टक्के अनुदान देण्यात येणार असल्याची माहितीकृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

फळबाग लागवड अंतर्गत ठिबक सिंचन करण्यासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून अनुदान देण्यात येते.त्यामुळे आता भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतून ठिबक ऐवजी सर्व प्रकारच्या आवश्यक खतांसाठी १०० टक्के अनुदान देण्यात येणार असून यासाठी अर्थसंकल्पात १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी आज भाऊसाहेब फुंडकर यांच्या जयंतीच्या दिवशी घोषित केली आहे.

राज्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करत मंत्री श्री. मुंडे यांनी आवश्यकता भासल्यास १०० कोटींच्या तरतुदीमध्ये आणखी वाढ करण्यात येईल, अशी माहिती देखील ट्विटर द्वारे दिली आहे. राज्य सरकारने ०६ जुलै, २०१८ रोजी भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजना राबविण्यास मान्यता दिलेली असून या अंतर्गत १५ फळपिकांचा समावेश करण्यात आलेला आहे. खड्डे खोदणे, कलमे लागवड करणे, पीक संरक्षण, नांग्या भरणे, ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे, इत्यादी कामे करण्यासाठी शेतकऱ्यांना शासन १०० टक्के अनुदान देते.

यापैकी ठिबक सिंचनाचे अनुदान राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून मिळत असल्याने, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेमध्ये ठिबक सिंचन ऐवजी आता सर्व प्रकारच्या खतांसाठी १००टक्के अनुदान दिले जाणार आहे.

## मिरज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज रस्त्याचे काम विहित वेळेत पूर्ण करा : डॉ.सुरेश खाडे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** मिरज शहरातील वाहतुकीसाठी छत्रपती शिवाजी महाराज रस्ता महत्वाचा आहे. या रस्त्याचे काम ऑक्टोबरपूर्वी होण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, महानगरपालिका, महावितरण, राज्य परिवहन विभाग यासह संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वयाने व सहकार्याने कार्यवाही करावी, असे निर्देश पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी आज दिले.

मिरज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज रस्ते कामाच्या आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक सभागृहात झालेल्या या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ.राजा दयानिधी,



**मिरज : शहरातील छत्रपती शिवाजी महाराज रस्ते कामाच्या आढावा बैठकीच्या प्रसंगी उपस्थित पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे व अधिकारी**

महापालिका आयुक्त सुनील पवार, मिरज उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे, महावितरणचे अधीक्षक अभियंता धर्मराज पेठकर, उपायुक्त स्मृती पाटील, कार्यकारी अभियंता आप्पासो खांडेकर, नगर भूमापन अधिकारी ज्योती पाटील, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळचे सुशांत पाटील आदी उपस्थित होते.

या रस्त्याच्या बांधकामात अडथळे ठरणाऱ्या १९३ विजेच्या खांबांचे स्थलांतर करण्याची कार्यवाही सुरू असून आठवडाभरात सर्व खांबांचे स्थलांतर करण्याच्या सूचना पालकमंत्री डॉ. खाडे यांनी यावेळी दिल्या. त्यासाठी महावितरणने विशेष लक्ष देऊन संबंधित ठेकेदाराकडून वेळेत खांबांचे स्थलांतर होईल, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. या रस्त्याच्या कामामध्ये एस. टी. महामंडळाकडील रस्त्यालगतची भिंत तसेच छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणाची भिंत अडथळा ठरत असल्याने हा अडथळा यंत्रणांनी त्वरित दूर करावा, असेही त्यांनी यावेळी सूचित केले. बैठकीमध्ये रस्ते कामामध्ये बाधित होणाऱ्या खाजगी मालमत्तांसंदर्भात चर्चा करण्यात आली.

## स्थानिक वैधमापन अधिकाऱ्यांकडून वजन काट्यांची पडताळणी व मुद्रांकन बंधनकारक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**


**मुंबई :** वैधमापन शास्त्र अधिनियम २००९ व त्याखालील नियमांनुसार सर्व प्रकारचे वजन व काटे यांचे आयात, उत्पादन, दुरुस्ती अथवा विक्री करावयाची असल्यास वैधमापन शास्त्र यंत्रणेकडून उत्पादनासाठी उत्पादक परवाना, दुरूस्ती परवाना अथवा विक्रीसाठी परवाना घेणे आवश्यक आहे. सर्व वजनकाट्यांची स्थानिक वैधमापन अधिकाऱ्यांकडून पडताळणी व मुद्रांकन करून घेणे बंधनकारक आहे. वजनकाट्यांची वेळेत पडताळणी व मुद्रांकन झालेले आहे किंवा नाही याची खात्री करावी व याबाबत कुठलीही तक्रार असल्यास वूलश्राींिलरळूरहे.ळप येथे ई-मेल करावा, असे आवाहन सहनियंत्रक, वैधमापन शास्त्र, मुंबई यांनी केले आहे.

परवाने न घेता राज्यात खुल्या बाजारात वजनकाट्यांची उत्पादन, दुरुस्ती व विक्री सुरु असल्याच्या तक्रारी वैधमापन शास्त्र विभागाकडे येत आहेत. तसेच चीनमधून येणाऱ्या अप्रमाणित वजनकाट्यांचीसुद्धा कमी दरात राज्यात खुल्या बाजारात विक्री केली जात आहे. या काट्यांना राज्य किंवा केंद्र शासनाची वैधानिक मान्यता नाही. सदरचे वजनकाटे अप्रमाणित असल्यामुळे ग्राहकहित साधले जात नाही. तसेच बाजारात अनधिकृत व्यक्ती त्यांचे स्टीकर वजनकाट्यांना लाऊन त्यांची अनधिकृत विक्री करीत आहेत. तरी ग्राहकहिताच्या दृष्टिकोनातून व्यापारी वर्ग, वजनमाप उपयोगकर्ते व ग्राहकांनी परवानाधारक व्यक्तीकडूनच वजन काट्यांची खरेदी अथवा दुरूस्ती करावी, असे आवाहनही सीमा बैस, सहनियंत्रक, वैधमापन शास्त्र विभाग यांनी केले आहे.

## राज्यातील सर्व गोवंशीय पशुधनाचे ७ दिवसांत लसीकरण करावे: राधाकृष्ण विखे पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्यातील गोवंशीय पशुधनामध्ये विषाणूजन्य व संसर्गजन्य लम्पी चर्मरोगाचा प्रादूर्भाव झाला आहे. या रोगाचा प्रादूर्भाव नियंत्रणात आणण्यासाठी राज्यात लम्पी चर्मरोग प्रतिबंधात्मक लसीकरण ७३ टक्के करण्यात आले आहे. उर्वरित लसीकरण ७ दिवसांत पूर्ण करण्याच्या सूचना सर्व संबंधित यंत्रणेला देण्यात आल्या आहेत. लसीकरण करून घेण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राहील, असे पशुसंवर्धन व दुध व्यवसाय मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.



राधाकृष्ण विखे पाटील

मंत्री श्री. विखे पाटील यांनीरॉयलस्टोन या शासकीय निवासस्थान येथून राज्यातील लम्पी चर्मरोगाविषयी दूरदृश्यप्रणालीद्वारे आढावा घेतला.त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे सचिव तुकाराम मुंडे उपस्थित होते.दूरदृश्यप्रणालीद्वारे आयुक्त हेमंत वसेकर यांच्यासह सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी, कृती दलाचे सदस्य उपस्थित होते.



